## निशाणी क्र.६० आणि ६१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांचे वारस मनोहर सावंत यांनी मयत अपीलकार अरूण गंगाराम सावंत यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ होणेसाठी आणि सदर विलंबामुळे वारसांविरूध्द् झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार अपीलकार हे दि.२८/०९/२०२० रोजी मुंबई येथे मयत झाले. अपीलकार हे कोरोना महामारीच्या काळामध्ये मयत झालेले आहेत. दरम्यानचे काळात अपीलकार याचे वारस रेकॉर्डवर दाखल करणे आवश्यक होते. परंतु त्या दरम्यान अर्जदार हे स्वत: आजारी होते. तसेच अर्जदार यांचे कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना अपीलकार यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झालेला आहे. सदरचे विलंबामुळे मयत अपीलकार यांचे वारसांविरूध्द् अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदरचा विलंब हा त्यांच्या निष्काळजीपणा अगर हलगर्जीपणामुळे झालेला नाही. विलंब माफ न झाल्यास अपीलकार यांचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरून येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे मयत अपीलकार यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत यावा आणि त्यांचेविरूध्द् झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होवून मिळावा, अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. अपीलकार यांचे विद्वान विधिज्ञ एस.एस.गवाणकर व उत्तरवादी यांचे विद्वान विधिज्ञ वाय.आर.खानोलकर यांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रस्तुतचे अपील हे वाटपाचे दाव्याविरूध्द् दाखल करणेत आलेले आहे असे दिसून येते. अपीलकार यांनी अर्जात नमूद केलेल्या कथनाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामुळे अपीलकार कथन करत असलेले अर्जातील कारण हे संभाव्य आहे असे वाटते. मा.सर्वोच्च न्यायालयाने कोव्हीड—१९ महामारीच्या काळामध्ये अर्ज दाखल करणेस झालेल्या विलंबास मुभा दिलेली आहे. त्यामुळे न्यायाच्या हितार्थ व वादाचे अंतिम निराकरण होण्याच्या दृष्टीने मयत अपीलकार

अरूण गंगाराम सावंत यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ होणेस आणि विलंबामुळे वारसांविरूध्द् झालेला अबेमेंटचा आदेश रद्दबातल होणे आवश्यक आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

— **<u>आदेश</u>** —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत अपीलकार अरूण गंगाराम सावंत यांचे वारस दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करणेत येत असून अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करणेत येतो.

(आर.बी.रोटे)
जिल्हा न्यायाधीश—१
सिंधुदुर्ग —ओरोस

दि.०७/०४/२०२२